GIPARD

# GOA INSTITUTE OF PUBLIC ADMINISTRATION & RURAL DEVELOPMENT



# Panchayati Raj Institutions and COVID – 19: Challenges And The Way Ahead.

(Let's beat it together)

GIPARD

# सार्वजनिक प्रशासन आणि ग्रामीण विकास संस्था गोवा

(जिपार्ड)

# जय्यत माहिती पुस्तिका

# पंचायत राज्य संस्था आणि कोविड-१९:

## आव्हाने आणि पुढील मार्ग

**(आम्ही संघटितपणे त्याला हरवूया)**

एला, जुने गोवे

एप्रिल २०२०

**अनुक्रमणिका**

१. प्रास्ताविक.

२. ग्राम पंचायतींसमोरील आव्हाने.

२.१ आरोग्यविषयक आव्हाने.

२.१.१ पंचायतींची भूमिका आणि संबंधित आव्हाने पेलण्यासाठीची तयारी.

२.१.२ ज्येष्ठ नागरिकांवर खास देखरेख.

२.३ आर्थिक आव्हाने.

२.३.१ आर्थिक आव्हाने पेलण्यासंदर्भात पंचायतींची भूमिका.

२.४ सामाजिक आव्हाने.

२.४.१ सामाजिक आव्हाने पेलण्यासंदर्भात पंचायतींची भूमिका.

२.५ मानसिक समस्या.

२.५.१ मानसिक समस्या हाताळण्यासंबंधी पंचायतींची भूमिका.

२.६ असंघटित मनुष्यबळाच्या व्यवस्थापनात पंचायतींची भूमिका.

३.१ पंचायतीकडून अतिरिक्त प्रयास.

३.२ ग्राम स्तरावरील समितींना क्रियाशील बनविणे.

३.२.१ समितींची भूमिका.

३.३ सार्वत्रिक काळजी/पूर्वतयारी.



## उद्देश

कोविड-१९ मुळे जी आव्हाने, समस्या आणि प्रश्न निर्माण झाले आहेत ते स्थानिक स्वराज्य संस्थांना अवगत व्हावेत ह्या उद्देशाने ही जय्यत माहिती पुस्तिका तयार करण्यात आली आहे. ह्या जय्यत माहिती पुस्तिकेच्या वापरानंतर पंचायतींना आपापल्या गावातील काळजी करण्याजोग्या/तातडीने दखल घेण्याजोग्या समस्या ध्यानात येतील आणि त्या समस्यांचे निराकरण करण्याच्या बाबतीत त्यांना मार्गदर्शन मिळेल.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या संदर्भातील प्रशिक्षण कार्यात मदत व्हावी या उद्देशाने ही पुस्तिका जय्यत माहितीनिशी तयार केली आहे. कोविड-१९ च्या कठीण काळात सगळ्याच बाबतीत अनिष्ट परिणाम झाला आहे. अशा अटीतटीच्या काळात ग्राम पंचायतींसमोरील आव्हाने यशस्वीरित्या पेलण्याची क्षमता त्यांना प्राप्त व्हावी हा या जय्यत माहिती पुस्तिकेचा उद्देश आहे.

# पंचायत राज्य संस्था आणि कोविड-१९: आव्हाने आणि पुढील मार्ग

(आम्ही संघटितपणे त्याला हरवूया)

**१. प्रास्ताविक:**

कोविड-१९ या महामारीने संपूर्ण जगालाच थांबवून धरले आहे. या महामारीच्या आणिबाणी परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी प्रत्येक राज्य, देश अथक प्रयत्न करीत आहे. अशावेळी प्रशासनातील प्रत्येक स्तरावरील सरकारी प्राधिकरणे आपापली कर्तव्ये बजावीत आहेत. ग्राम पंचायती या स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून तळागाळातील लोकांपर्यंत पोचणाऱ्या तथा सरकारी सेवा प्रदान करणाऱ्या संस्था असल्याने त्यांना अशा प्रसंगी अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडावी लागेल.

**२. ग्राम पंचायतींसमोरील आव्हाने:**

आमचा देश या महामारीसंदर्भातील अनेक आव्हानांचा सामना करीत आहे. आमचा गोवा देखील त्याला अपवाद नाही. म्हणूनच ही आव्हाने कोणती आहेत ती ध्यानात घेऊन, ती समर्थपणे पेलण्यासाठी योग्य ती कृतीयोजना तयार करून ती कार्यान्वित करणे महत्वाचे ठरते.

कोविड-१९ चे स्वरूप ध्यानात स्थानिक शासकीय संस्थांनी पुढे नमूद केलेल्या स्वरूपाच्या समस्या सोडवाव्या लागतील.

## २.१ आरोग्यविषयक आव्हाने:



कोविड-१९ मुळे आरोग्याची प्रमुख समस्या निर्माण झाली आहे. कोविड-१९ आणि अन्य तत्सम व्याधींपासून प्रत्येक व्यक्तीचा बचाव करण्यासाठी स्वच्छता, आरोग्यशास्त्र आणि त्या संबंधीचे शिष्टाचार पाळण्याविषयी संपूर्ण काळजी घेणे आवश्यक आहे. प्रत्येक ग्राम पंचायतीला, आपल्या गावातील प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक वार्ड/ विभाग आणि संपूर्ण गाव सुरक्षित असून, प्रत्येक नागरीक आपापले आरोग्य सांभाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेत आहे याची खातरजमा करून घ्यावी लागेल.

### २.१.१ पंचायतींची भूमिका आणि संबंधित आव्हाने पेलण्यासाठीची तयारी:

१. नागरिकांनी घ्यावयाच्या दक्षतेविषयी त्यांच्यात सातत्याने जागृती करणे.

२. शाळा, अंगणवाडी, रेशनची दुकाने/केंद्रे, पंचायत कार्यालय, बस स्टॉप्स आणि अन्य सार्वजनिक स्थळांवर ठराविक दिवसांनी धुरी घालणे (फ्युमिगेशन) आणि स्वच्छता मोहीमेसारखे उपक्रम सर्वच वार्डांमधून करणे.

३. कोरोना पॉझिटिव्ह चाचणी झालेल्यांची माहिती (डेटाबेज) गोळा करणे. त्यामुळे गावातील अशा व्यक्तींच्या आरोग्यावर देखरेख करणे सुलभ होईल. अशा व्यक्तींना योग्य ती वैद्यकीय कार्यवाही आणि आवश्यक तो पाठपुरावा करण्यासाठी प्रोत्साहित करणे.

४. घरांमधून संसर्गरोधन विलगीकरण (होम क्वारंटाइन) केलेल्या कुटुंबावर देखरेख करणे.

५. गावातील एखाद्या कार्यक्रम/संमेलनासाठी परवानगी दिल्यावर गावच्या लोकानी आयोजिलेल्या कार्यक्रम /संमेलनावर देखरेख ठेवणे.

६. ज्येष्ठ नागरीक आणि मुलांसाठी ठराविक कालांतराने आरोग्य तपासणी कार्यक्रम, आरोग्यविषयक शिबिरे यांचे आयोजन करणे.

७. गावातील सार्वजनिक शौचालयात (टॉयलेट) पाणी पुरवठा चालू आहे याची खातरजमा करणे.

८. प्रत्येक ग्राम पंचायतीत वापरण्यायोग्य अशा थर्मल गन तयार ठेवून तेथे येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची थर्मल गन करवी तपासणी करणे.

९. ओला आणि सुका कचरा घरच्या घरी वेगळा करणे अनिवार्य ठरविण्यात आले आहे. तो तसा वेगळा करून त्याची विल्हेवाट लावण्यासाठी प्रोत्साहित करणे. तसेच तो ठराविक वेळेला एकत्रित करणे.

१०. प्रत्येक वॉडमधील आरोग्याची गंभीर स्थिती असलेल्या व्यक्तींची माहिती/ यादी तयार करणे. त्यामुळे अशा व्यक्तींच्या प्रकृतीवर देखरेख ठेवून आवश्यक ती काळजी घेता येईल.

११. आरोग्यशास्त्र आणि स्वच्छता मोहीम राबविणे.

१२. सार्वजनिक ठिकाणी सामाजिक अंतर पाळणे, व्यक्तीगत आरोग्यविषयक शिष्टाचार पाळणे, मुखावरण (मास्क) वापरणे या नियमांचा भंग

करणाऱ्यांना दंड देण्याची पद्धत/तपशील ठरविणे.

१३. पंचायत क्षेत्रातील संपूर्ण सार्वजनिक ठिकाणांवर आरोग्यशास्त्राची अंमलबजावणी, स्वच्छता पाळणे, सामाजिक अंतर राखणे, प्रवेश-निर्गमन अशा कृतींच्या संदर्भात शिष्टाचार ठरविणे/ नियम घालून देणे.

१४. कोविड-१९ संबंधीच्या प्रत्यक्ष माहितीसह (डेटा) उच्च स्वरूपाची जागृती मोहीम निर्माण करणे.

१५. कोरोनाच्या संशयीत व्यक्तींना आणि खास करून गोवा राज्याबाहेरून गोव्यात **परतणाऱ्या** संशयित व्यक्तींना हाताळण्यासाठी योजनेची/यंत्रणेची मांडणी करणे. त्या दृष्टीने परदेशात अडकलेले विद्‍यार्थी, दर्यावर्दी सेवक आणि अन्य लोक गोव्यात परतण्याची अपेक्षा आहे, हे महत्वाचे आहे. ही योजना आरोग्य प्राधिकारिणीच्या संयुक्त विद्‍यमाने कार्यान्वित करावी.

१६. विविध सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महाविद्‍यालयांच्या मदती मोबायल ॲप तयार करूने

घेऊन, त्यातील सेवा संबंधीचा तपशील/माहिती उपलब्ध करून देणे.

१७. लोकांची मानसिकता आणि आचरणविषयक बदल हा खूप महत्वाचा असतो. ही वस्तुस्थिती ध्यानात घेऊन कोविड-१९ विषयीची संपूर्ण माहिती, आरोग्यशास्त्रविषयीच्या आवश्यक चालीरिती, प्रत्येकाने न चुकता करावयाच्या तसेच न करावयाच्या गोष्टी, सामाजिक अंतर पाळणे आणि अन्य गोष्टींचा प्रचार-प्रसार करण्याची योजना आखून ती कार्यान्वित करणे.

१८. आरोग्याचा सांभाळ करण्यासंबंधीचा शैक्षणिक कार्यक्रम तयार करणे.

१९. घरातच विलगीकरण केलेल्या/संसर्गरोधनासाठी ठेवलेल्या व्यक्तींपर्यंत थेट संपर्काची तरतूद करणे.

२०. गरजेनुसार आवश्यक त्या आरोग्यसेवा आणि लसीकरण या सारख्या सेवा नियमितपणे पुरविल्या जात असल्याबद्दल खातरजमा करणे.

२१. गावातील प्रत्येक वॉर्डमधील सुशिक्षीत बेरोजगारांची माहिती (डेटाबेज) तयार करणे. ह्या शिक्षितांना मलमपट्टी करणे, रक्तदाब तपासणे, रक्तातील साखरेचे प्रमाण तपासणे, इंजेक्शन देणे आणि अन्य निमवैद्यकीय कामांचे प्रशिक्षण देणे, त्याच प्रमाणे मधुमेह, लहान-सहान दुखापती, उच्च रक्तदाब असलेल्यांना सेवा पुरविण्यासाठी त्यांची मदत घेता येईल.

२२. कोविड-१९ संदर्भातील विविध सेवांविषयीची महत्वाची माहिती, व्यवस्थापन योजना/ आराखडा आणि अन्य अत्यंत महत्वाची माहिती (की-इन्फॉर्मेशन) घालून व्हॉटसऍपचे वेगवेगळे गट (ग्रुप्स) तयार करता येतील. हे गट प्रत्येक वॉर्डसाठी वेगळे असावेत आणित्या गटांचे नियंत्रण संबंधित वॉर्डच्या सभासदाकडे असावे. अशा गटांना नियमितपणे नव-नविन अद्ययावत माहिती पुरविणे.

२३. आरोग्य आणि स्वच्छताविषयक समितीला कार्यान्वित करून वर उल्लेखित मुद्यांच्या संदर्भात नियमितपणे अहवाल मिळविण्यासाठी सरपंचानी पुढाकार घेणे.

२४. लोकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी स्थानिक

अशा धार्मिक, सामाजिक, बिनसरकारी संस्थांना या कार्यात सामावून घ्यावे.

२५. सरकार तसेच जिल्हा प्रशासन, पोलीस आणि आरोग्य प्राधिकारिणी यांच्याकडून वेळोवेळी आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन आणि पूर्तता करणे.

**२.१.२ ज्येष्ठ नागरिकांवर खास देखरेख.**



समाजातील ज्येष्ठ नागरीक हे अन्य व्यक्तींच्या तुलनेने सगळ्यात जास्त आघातक्षम आणि असुरक्षित असतात. म्हणूनच त्यांच्यावर खास लक्ष देणे क्रमप्राप्त ठरते. गावातील ज्येष्ठ नागरिकांना केंद्रभूत मानून त्यांच्या देखरेखीसाठी एखादा गट पंचायतीने स्थापन करावा.

१. ज्येष्ठ नागरिकांमध्ये संक्रमणाची शक्यता जास्त असल्याने फोनवरून त्यांची सतत विचारपूस करणे.

२. त्यांना नित्योपयोगी वस्तू, सामान आणि औषधे वेळीच पुरविण्यासाठी आराखडा तयार करणे.

३. जर त्यांना घरातच राहावे लागत असेल, तर निदान

एका महिन्याला पुरेल एवढी औषधे त्यांना पुरविण्यात आली आहेत याची खातरजमा करून घेणे.

४. त्यांना डॉक्टर, शेजारी, मित्र आणि कुटुंबीय यांच्याशी संपर्क साधण्यासाठी मदत करणे.

५. त्यांचे हात पुन्हा पुन्हा धुवून स्वच्छ करणे. त्यांच्या वैयक्तिक वस्तू आणि जमीन/फरशी स्वच्छ ठेवणे, तसेच प्रकृती ठीक नसलेल्या व्यक्तींचा शारीरिक संपर्क टाळणे, इत्यादी गोष्टींची ज्येष्ठ नागरिकांना पुन्हा पुन्हा आठवण करून द्या.

६. त्यांची प्रकृती बिघडल्यास त्यांना त्वरेने वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी आवश्यक त्या वाहतुकीची योजना तयार करावी. त्यांच्या प्रकृतीच्या स्थितीसंबंधी साप्ताहिक तपासणी करून घ्या.

७. निरोगी जीवनशैलीसाठी सत्त्वयुक्त आहार घेणे, आवश्यक तेवढी झोप घेणे, धूम्रपान टाळणे, सदैव सक्रीय/ तरतरीत राहाणे आणि नियंत्रित मद्यवापर करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देणे.

८. त्यांना ममत्वाने सहानुभूती दाखवा. त्यांच्याशी

आपलेपणाने बोला व ते काय सांगतात ते ऐकून घेण्याची तसदी घ्या. त्यांना आपल्या मानसिक ताणातून बाहेर पडून सावरण्यासाठी मदत करा.

**२.३ आर्थिक आव्हाने:**

गावातील अनेक कुटुंबाना टाळेबंदीमुळे (लॉकडाऊन) उपजीविकेचे साधन गेल्यामुळे उत्पन्न बुडाले असल्याने आर्थिक चणचण भोगावी लागत आहे. त्यांच्या आर्थिक उलाढालींवर विपरीत परिणाम झाला आहे. पर्यटन, हॉटेल, उद्‍योग,



सार्वजनिक वाहतूक आणि सेवां-विषयक उद्‍योग या महत्वाच्या क्षेत्रात परदेशी धनप्रेषणात (रोख रकमेची आयात) मंदी येईल. त्यामुळे लोकांच्या उत्पन्नावर गदा आल्याने स्थानिक अर्थकारणावर मोठ्या प्रमाणात अनिष्ट परिणाम दिसून येईल. म्हणूनच अशा निर्वाणीच्या काळात आम्ही आमचा गाव निश्चितच स्वयंपूर्ण आणि स्वयं-टिकावक्षम करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे आवश्यक आहे.

कोविड-१९ च्या काळात ग्राम पंचायतींसमोरील हे मोठे

आव्हान उभे ठाकले आहे. म्हणूनच पंचायतींनी गावातील लोकांना उपजीविकेचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी गावामध्येच अशा साधनांचा शोध घेऊन, शक्यतो सर्व कामे कार्यान्वित करणे आवश्यक आहे. त्यासाठी शेती आणि तत्संबंधीची अन्य कामे, बागाईत, पशुपालन, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, मच्छिमारी, तसेच अन्य सूक्ष्म आणि लघु उद्योग सुरू करणे अथवा पुनरूज्जीवित करणे या विषयीच्या सर्व शक्यता पडताळून पाहाणे हे अधिकाधिक लोकांना उपजीविकेचे साधन मिळवून देण्याच्या बाबतीत खूप महत्वपूर्ण ठरेल. शिवाय उपजीविकेचे पारंपारीक पर्याय, कारागिरी आणि अन्य व्यवसायाचे पुनरूज्जीवन करता येईल.

### २.३.१ आर्थिक आव्हाने पेलण्यासंदर्भात पंचायतींची भूमिका:

१. गावातील कृषि उद्योग, बागायतीसंबंधीचे अन्य व्यवसाय यांमधून व्यावसायिकदृष्ट्या उपलब्ध होऊ शकणाऱ्या संधींची यादी तयार करावी. ही यादी तयार करताना विशिष्ट चर्चात्मक गट (एफजीडी), स्वयं साहाय्य गट, शेतकरी आणि बेरोजगार युवक यांची मदत घेण्यात यावी.

२. गावातील लोकांकडून कोणती कामे करून घेता येतील,तसेच प्रकल्प कार्यान्वित करता येणे शक्य समजून घेण्यासाठी ग्राम विकास योजनेच्या आहे (जीपीडीपी) मागील पाच वर्षांचा अहवाल तपासून पाहावा. त्यानुसार कार्यवाहीसाठी आराखडा तयार करावा.

३. पंचायतींच्या उत्पादन समितीना कामाला जुंपून शेतीच्या पुनरूज्जीवनासाठी तज्ञांच्या मदतीने कृती-योजना तयार करणे.

४. गावातील स्वयं साहाय्य गटांना सोबत घेऊन शेती, अन्न-प्रक्रिया, मालाचा दर्जा उंचावण्याच्या कार्य-योजना आणि तत्संबंधी अन्य उपक्रम कार्यान्वित करणे.

५. कृषिमालाच्या विक्रीसाठी व्यापारी केंद्रे/ बाजारपेठांचा शोध घेणे, तसेच अन्य यंत्रणा कार्यान्वित करणे. शेती, बागाईत, पशुपालन, मधमाशी पालन, रेशमांच्या किड्यांचे पालन, मत्स्य पालन हे व्यवसाय आणि त्यातील कौशल्यवाढीसाठीचे प्रशिक्षण कार्यक्रम संबंधित यंत्रणांच्या सहयोगाने कार्यान्वित करणे.

६. परसबाग करण्यासाठी प्रोत्साहन देणे.

७. परसबाग आणि शेतीसाठी उपयोगी पडणारे कंपोस्ट खत (व्हर्मिकपोस्टिंग) तयार करण्यास प्रोत्साहित करणे.

८. ह्या क्षेत्रात वावरताना उत्पन्नात वाढ करण्याच्या दृष्टीने गावातील स्वयं साहाय्य गटांना प्रोत्साहित करणे. त्याचा परिणाम म्हणून गावात उपजीविकेच्या सूक्ष्म तसेच लघु उद्योगांच्या संधी उपलब्ध होऊन त्या कार्यान्वित होताच त्यांचा लाभ होऊ शकतो.

९. गावातील लोकांना गरज भासेल तेव्हा आवश्यक सेवा पुरविण्यासाठी स्वयं साहाय्य गटांना प्रोत्साहन द्यावे. (सामूहिक स्वयंपाक चालविणे, मुखावरणांची (मास्क) शिलाई करणे, दैनंदिन गरजेच्या वस्तू घरोघरी पोचविणे, आवश्यक त्या वस्तू आणि सेवा उपलब्ध करून देणे आणि अन्य.)

१०. ग्राम पंचायतींसाठी उत्पन्नाचे पर्यायी स्रोत शोधायाच्या दृष्टीने अभ्यास करणे आणि त्या संबंधीची कृती योजना तयार करून कार्यान्वित करणे.

११. सामूहिक शेती करण्यासाठी गावातील कोमुनिदादीच्या मालकीची वा अन्य पडीक जमीन शोधून काढणे.

१२. गावातील उपलब्ध पाणवठ्यांचा उपसा करण्याचे प्रकल्प हाती घेऊन ते कार्यान्वित करणे. त्याशिवाय गावातील लोकांना लाभ व्हावा या हेतूने गावातील नैसर्गिक संसाधने हेरून त्यावर आधारलेले प्रकल्प हाती घेऊन कार्यान्वित करणे.

**२.४ सामाजिक आव्हाने:**



सध्याच्या सामाजिक परिस्थितीत अनेक सामाजिक समस्या उद्भवण्याची शक्यता आहे. त्यात दारूचे व्यसन, मादक द्रव्यांच्या सेवनाचे व्यसन, महिलांची विकृत थट्टामस्करी, महिलांवरील अत्याचार, लैंगीक शोषणाच्या घटना, शाळा-विद्यालयांतून विद्यार्थ्यांची गळती, बेकारीमुळे चोरी, मारामारी, दरोडे, कौटुंबिक हिंसाचार आणि अन्य प्रकारांचा समावेश होतो. भारतासह जगात सर्वत्र टाळेबंदीच्या (लॉकडाऊन) काळात कौटुंबिक अत्याचाराच्या घटनांमध्ये

वाढ झाल्याचे दिसून आले आहे. ह्या टाळेबंदीच्या काळात विद्यार्थीसुद्धा आपल्या शिक्षणापासून दूरच राहिले आहेत. गावाच्या दृष्टीने ही स्थिती खूप महत्वाची ठरते. म्हणूनच आपल्या गावातून असल्या सामाजिक समस्या दूर व्हाव्यात म्हणून प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच गावातील युवा वर्गाला अर्थपूर्ण जबाबदाऱ्या आणि सामाजिक उपक्रमांतून सहभागी करून घेणे अत्यंत गरजेचे आहे.

**२.४.१ सामाजिक आव्हाने पेलण्यासंदर्भात पंचायतींची भूमिका:**

१. गावातील युवा वर्गाला अर्थपूर्ण उपक्रमांमध्ये सामावून घेणे.

२. गावातील युवा वर्गासाठी कौशल्यवर्धन आणि स्वयंरोजगार उपक्रम.


३. नैराश्य, एकलेपणा अशा प्रश्नांवर अधून-मधून सत्रे आयोजित करून प्रेरणा निर्मिती.

४. गावातील युवा वर्ग/ विद्यार्थी यांना पंचायतीच्या / गावाच्या विविध समित्यांवर सदस्यरुपाने सामील होण्यास सांगावे. तेणेकरून ते प्रत्येक समितीच्या कार्यात समरसून आपले योगदान देऊ शकतील.

५. भ्रमणध्वनी (मोबायल) कसा कौशल्यपूर्ण रितीने वापरावा (इ-स्किल) हे युवा वर्गाला शिकविण्यास सांगावे. (उदाहरणार्थ- स्वयं साहाय्य गटातल्या महिलांना, ज्येष्ठ नागरिकांना आणि समाजातील इतराना मोबायलचा वापर कसा करावा आणि विविधोपयोगी ॲप्स कशी डाऊनलोड करावित अशा स्वरूपाचे कौशल्य). त्याद्वारे समाजात व्यापक प्रमाणात तंत्रज्ञानाचा प्रसार होऊ शकेल.

६. गावातील युवा वर्गाची, तसेच संपूर्ण घरांची माहिती (डेटाबेज) स्थानिक युवक तयार करू शकतात. शासकीय आणि सार्वजनिक मालमत्तेची यादी, त्याच प्रमाणे गावातील विविध विभाग, वाडे, रस्ते, स्थळे इत्यादींच्या नावांचे तक्ते (सायनेजीस) आणि संपर्क/संचार आराखडा हा युवा वर्गाकडून तयार करून घेता येईल.

## २.५ मानसिक समस्या:



नोकरी गमवावी लागणे, रोजगाराच्या संधी क्षीण होणे इत्यादींमुळे लोकांमध्ये मानसिक ताण-तणाव निर्माण होतात. त्याचा परिणाम म्हणून भविष्यात नैराश्य, मानसिक ताण, कुटुंबात बेबनाव, नाते-संबंधांवर अनिष्ट परिणाम वगैरे मानसिक समस्या उद्भवण्याची शक्यता आहे. कोविड-१९ काळात लोकांमध्ये मानसिक ताण-तणाव घटना वाढीस लागल्याचे अहवाल वरचे वर येत असतात.

### २.५.१ मानसिक समस्या हाताळण्यासंबंधी पंचायतींची भूमिका:

१. ठराविक काळातून ताण-तणावांचे व्यवस्थापनविषयक (स्ट्रॅस मेनेजमेंट) सत्रे घडवून आणणे. अशा सत्रांची ध्वनिचित्रफीत तयार करून तिचे सर्वत्र प्रदर्शन घडवून आणणे.

२. वेळेच्या व्यवस्थापनाची (टाइम मेनेजमेंट) सत्रे आयोजित करणे.

३. पंचायतीच्या कक्षेत समुपदेशन केंद्र स्थान करणे. त्या केंद्राकडून प्रत्यक्ष आणि फोनद्वारे समुपदेशन करण्याची मुभा उपलब्ध करून देणे.

४. पंचायतीच्या सर्व समित्यांना या उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देणे.

५. कौटुंबिक हिंसाचार, अत्याचार आणि अन्य प्रश्न सोडविण्यासाठी हेल्पलाईनची व्यवस्था करणे. या संदर्भात 'सांगात', मानसोपचार आणि मानव-वर्तन संस्था (आयपीएचबी), अथवा अन्य सेवादायी संस्थेचे सहकार्य घेता येईल.

**२.६ असंघटीत मनुष्यबळाच्या व्यवस्थापनात पंचायतींची भूमिका:**

अर्थव्यवस्थेला गावातील असंघटित मनुष्यबळ आपले योगदान देत असते. हे असंघटित मनुष्यबळ ग्राम पंचायतीने आरोग्यशास्त्र आणि सार्वजनिक आरोग्य या विषयी घालून दिलेल्या शिष्टाचारांचे पालन करते ना, या विषयी ठराविक कालांतराने देखरेख करण्याची जबाबदारी ग्राम पंचायतींवर असते.

१. प्रत्येक वॉर्डमधील असंघटित मनुष्यबळाची/ कामगारांची/ मजुरांची यादी (डेटाबेज) तयार करणे.

२. कामे चालू असलेल्या जागा हेरून संबंधित रोजगारादाराकरवी सामाजिक अंतर आणि व्यक्तिगत आरोग्यशास्त्राविषयीच्या तरतुदी पूर्ण करता येतील.

३. प्राथमिक आरोग्य केंद्रांकडून असंघटित कामगारवर्गामध्ये रोगाची लक्षणे दिसतात किंवा नाही यासंबंधीची ठराविक कालांतराने तपासणी करून घेणे.

४. अंगणवाडी/शाळा यामधून जर स्थलांतरितांची मुले भरती झाली तर ठराविक दिवसांनी त्यांची वैद्यकीय तपासणी करून घेणे.

५. गरज भासल्यास सामूहिक स्वयंपाकघराची योजना हाती घेणे.

**३. पंचायतीकडून अतिरिक्त प्रयास:**

वर उल्लेखित सर्व मुद्यांबरोबरच ग्राम पंचायतींनी पुढे दिलेले उपक्रम देखील कार्यान्वित करणे आवश्यक आहे. तसे केल्याने त्यांच्या पुढील आव्हाने अधिक परिणामकारक रितीन पेलणे शक्य होईल.

## ३.१ डेटाबेज तयार करणे:



विविध सेवा पुरविणारे पुरवणदार/ शासकीय खाती/ स्वयंसेवी संस्था/ शाळा आणि महाविद्यालये यांच्याशी ग्राम पंचायतीला संपर्क संस्थेची भूमिका बजावावी लागेल. या सर्वांची संपूर्ण माहिती/ तपशील (डेटाबेज) संबंधित सरपंच, पंच, सचिव आणि ग्राम विकास समितींचे निमंत्रक यांनी तयार करून ठेवणे आवश्यक आहे.

१. सर्व महत्त्वाची कार्यालये, अधिकारी, पोलीस, तुमच्या भागातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक, महाविद्यालयांचे प्राचार्य प्रिंसिपॉल, डॉक्टर्स, वैद्यकीय पेशातील व्यक्ती, स्थानिक अग्नीशमन आणि आपत्कालीन सेवा देणारे दळ, तसेच अन्य संबंधितांची संपूर्ण माहिती/ तपशील (डेटाबेज) तयार करणे.

२. प्रत्येक वॉर्डमध्ये निवासाला असलेल्यांची आणि खास करून एकट्याने राहाणारे ज्येष्ठ नागरीक याची संपूर्ण माहिती/ तपशील टेलिफोन क्रमांकासह तयार ठेवणे.

३. गावातील सर्व संस्था, क्लब, यांच्या संपर्कासाठीची सविस्तर माहिती गोळा करणे.

४. प्रत्येक वॉर्डसाठी स्वतंत्र अशी तिथल्या घरांशी संपर्क साधाण्याविषयीची माहिती तयार ठेवणे. हा तपशील गोळा करण्यासाठी एनएसएस स्वयंसेवक, एनसीसी कॅडेट्स, शिक्षक आणि वॉर्ड सदस्य यांची मदत घ्यावी. ( त्यांच्याकडूनच ही माहिती गोळा करून घ्यावी.)

५. गावात राहाणाऱ्या असंघटित मनुष्य बळाची माहिती/ तपशील (डेटाबेज) तयार करणे.

६. प्रत्येक वॉर्डनुसार तेथील विद्यार्थ्यांची माहिती (डेटाबेज) तयार करणे.

७. गावातील लोकाना गरजेच्या प्रसंगी संपर्क करता यावा यासाठी प्लंबर, इलेक्ट्रिशियन, सुतार तसेच अन्य सेवा पुरविणाऱ्यांची संपर्क यादी (नामदर्शिका) तयार करणे.

**३.२ ग्राम स्तरावरील समितींना क्रियाशील बनविणे:**

गावातील ग्राम विकास समिती आणि अन्य सर्व समितींना

क्रियाशील बनविणे अत्यावश्यक आहे. ही जबाबदारी केवळ ग्राम पंचायतीचे सदस्य आणि सहकारीच पूर्ण करू शकणार नसल्याने अशा काळात अन्य पंचायत समितीच्या सर्व सदस्यांचे सक्रीय सहकार्य त्यांना आवश्यक ठरते.

**३.२.१ समितींची भूमिका:**

ग्राम विकास समितीने सरपंच आणि अन्य सदस्यांच्या समवेत राहून कार्य पुढे नेण्यास मदत करावी.

**अ.** गावातील ज्या व्यक्ती प्रवासातून आलेल्या असतील त्यांचा सविस्तर तपशील ग्राम विकास समितीला गोळा करता येईल. सदर तपशील तयार केल्यावर हेल्पलाईन क्रमांकावर कळवून तो प्राथमिक आरोग्य केंद्रे, सामुदायिक आरोग्य केंद्रे यांनाही कळविता येईल. जे राज्याबाहेरील प्रदेशातून गावात आलेले आहेत त्यांना हुडकून, त्यांचा तपशील गोळा करण्याच्या कामी ग्राम विकास समितीने सक्रीय राहाणे आवश्यक आहे.

**आ.** गावात **राहाणाऱ्या** ज्येष्ठ नागरिकांची नोंद ग्राम विकास समितीने करून ठेवावी आणि जेव्हा रेशन, आरोग्यविषयक सेवा अशा सेवांचा पुरवठा करतात,

तेव्हा त्या सेवा ज्येष्ठापर्यंत पोचतील याची खबरदारी सदर समितीने घ्यावी.

**इ.** अत्यावश्यक सेवा आणि रेशनचे सामान सर्वांना मिळावे यासाठी प्रत्येक वॉर्डमध्ये ग्राम विकास समितीने वितरण केंद्राची जागा ठरवावी.

**ई.** टाळेबंदी (लॉकडाऊन) आणि त्या संदर्भातील निर्बंध ( जे संबंधीत शासकीय अधिकारिणी वेळोवेळी लागू करते ) त्यावर ग्राम विकास समितीने देखरेख करावी आणि जी व्यक्ती अशा शिष्टाचारांचे पालन करीत नसेल, त्याचा अहवाल संबंधित प्राधिकारिणीला पोचता करावा.

**उ.** ग्राम विकास समितीने गरजूंची यादी तयार करावी म्हणजे त्यांना हवी असलेली मदत वेळीच पोचविणे सुलभ होईल.

**ऊ.** गावातील सेवा-पुरवण, रेशन वितरण यांवर ग्राम विकास समितीने देखरेख करावी.

**ए.** गावातील युवा वर्गाला, गावच्या स्वयं साहाय्य गटांच्या सदस्या, ज्येष्ठ नागरीक इत्यादींना स्मार्ट फोन कसे

हाताळावेत यांची माहिती देण्यासाठी उद्‌युक्त करावे.

**ऐ.** गावातील प्रत्येक वॉर्डसाठी ग्रामविकास समितीने एक जागरूकता गट ( व्हिजिलंट ग्रुप ) स्थापन करावा. हा गट वॉर्डमध्ये येणार्या लोकांवर देखरेख करेल आणि च्या त्या नवागत व्यक्ती, दुकानदार, गिर्‍हाईक हे सामाजिक अंतर पाळणे, मुखावरण (मास्क) घालणे यासारखे शिष्टाचार पाळतात की नाही याची नोंद ठेवेल. त्यासाठी सदैव जागृत राहून वॉर्डमधून फेरफटका मारणे आवश्यक असते.

**ओ.** लोकांना आवश्यक असलेल्या सेवा- क्लिनिक्स, किरणा मालाची दुकाने, रेशन दुकाने वगैरे उघडी असून संबंधितांना त्याविषयी कोणतीही अडचण येणार नाही याची खबरदारी पंचायतींन घेणे आवश्यक आहे.

**३.३ सार्वत्रिक काळजी/पूर्वतयारी:**

१. पंचायतीनी पावसाळ्यात उद्भवणार्‍या मलेरिया, डेंग्यू आणि तत्सम साथीना समर्थपणे तोंड देण्यासाठीची आवश्यक ती सिद्धता करणे.

२. ओला आणि सुका कचरा यांची यथायोग्य विभागणी करणे आणि त्याची विल्हेवाट लावण्यासाठी लोकांना शिक्षित करणे.

३. गणेशचतुर्थी सारख्या सणा-सुदीच्या दिवसात ग्राम पंचायतीनी हाताळण्याच्या प्रश्नांची व त्यावरील तोडग्यांची सिद्धता करणे.

४. अगदीच गरज भासल्यास सामुदायिक स्वयंपाकघराची योजना मार्गी लावण्यासाठी आराखडा तयार ठेवणे. ही जबाबदारी गावातील स्वयं साहाय्य गटांवर सोपविता येईल. गावातील प्राथमिक विद्यालये यासाठी स्वयंपाकगृहे चालविण्याची केंद्रे म्हणून वापरता येतील.

५. कोविड-१९ पॉझिटिव्ह रूग्ण आणि त्याच्या /तिच्या कुटुंबियांना कोणतेही लांछन येऊ नये यासाठी काळजी घेणे. अत्यावश्यक सेवा पुरवठादार आणि आरोग्याची काळजी घेणाऱ्यांना वास्तविक स्वरूपाची आणि खरीखुरी ( मौलिक ) माहिती देणे.

६. सजगतेने आणि विवेकी वृत्तीने योजना आखून आरोग्याची काळजी घेण्यासाठीच्या सुविधा, सध्या उपलब्ध असलेल्या साधन-सुविधा, पाणवठे, गावातील रस्ते आणि अन्य संबंधित कामांसाठी निधीची त्वरेने तरतूद करणे.

७. कोणत्याही संभाव्य आपत्कालीन आपत्तीला तोंड देण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार ठेवणे.

(सूचना: या 'जय्यत माहिती पुस्तिकेत' सुचविलेली/चर्चा केलेली ग्राम पंचायतींसमोरील आव्हाने आणि त्यासंबंधीच्या कार्यवाही या सर्वांगपरिपूर्ण नाहीत. म्हणून पंचायतीनी यात नमूद केलेल्या आव्हानांत आणि सूचनांमध्ये नविन आव्हानांचा समावेश करण्याचा आणि त्यासंबंधीचे नवनवे तोडगे सुचविण्याचा प्रयत्न चालू ठेवावा.)

- आम्ही संघटितपणे त्याला हरवूया !

**GOA INSTITUTE OF PUBLIC ADMINISTRATION & RURAL DEVELOPMENT**

Ela Farm, Old Goa 403402,

Tel : 0832-2285985, 2285755,2284004

Email : gird.goa@nic.in | www.gipard.gov.in